बंजारा समाजातील विद्यार्थ्यांचे प्राथमिक स्तरावरील शैक्षणिक विकासात मानववंशशास्त्रीय आणि संस्कृती आधारीत अध्यापनशास्त्राची भूमिका व परिणामकारकता एक अभ्यास

प्रबंध अहवाल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत विद्यावाचस्पती पीएचडी शिक्षणशास्त्र पदवीसाठी सादर करण्याचा संशोधन आराखडा

संशोधक

स्वाती रामचंद्र राठोड

शिक्षणशास्त्र संकुल,

मार्गदर्शक

डॉ. जोशी एम. एम (सहाय्यक प्राध्यापक)

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

शैक्षणिक वर्ष

2021

अनुक्रमणिका

अनुक्रमाक	तपशिल	पान क्रमाक
०१	प्रस्तावना	०३
०२	शीर्षक	०४
०३	समस्या विधान	०४
०४	संशोधनाची गरज	०४
०५	संबंधित साहित्याचा आढावा	०४
०६	संशोधनाचे महत्त्व	०५
०७	समस्येचे स्पष्टीकरण	०५
०८	संशोधनाची उद्दिष्टे	०५
०९	संशोधनाची गृहितके	०६
१०	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	०६
११	संशोधनाची परिकल्पना	०६
१२	संशोधनाची कार्यपद्धती	०५
	संशोधन पद्धती	०७
	नमुना निवड पद्धती	०८
	माहिती संकलनाची साधने	०८
१३	माहिती विश्लेषणाची साधने	०८
१४	प्रकरण योजना	०८
१५	वेळापत्रक	०९
१६	खर्चाचे अंदाजपत्रक	०९
१७	संदर्भ ग्रंथ	१०
१८	समारोप	१०

प्रस्तावना

भारत देश हा विविध संस्कृतीने नटलेला देश आहे . सर्व देशात भारतीय संस्कृती ही विशेष आहे. भारत देशावर अनेक परकीय आक्रमणे झाली आणि या परकीय आक्रमणातून भारतीय समाजाच्या जडणघडणीवर परिणाम झालेला दिसून येतो परकीय आक्रमणातून त्या त्या संस्कृतीचे बरीशी मूल्य येथे रुजली गेली. भारतीय संस्कृतीत वैशिष्ट्यपूर्ण गुणांचा समुच्चय अनेक समाजावर पडलेला आहे. त्यात बंजारा समाज सांस्कृतिक एकात्मता शिक्षणातून सुद्धा जोपासली जाते. समाजाच्या शिक्षण पद्धतीचा अभ्यास करताना त्या त्या देशातील धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, अशा संदर्भ बाबींचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून मानववंशशास्त्र व संस्कृती यांचा अभ्यास यात झालाच पाहिजे. आजचे युग हे विज्ञान युग असून इतर समाजाच्या बंजारा समाजाचा विकास हा झालेला नाही म्हणून या समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे या संशोधनाचा हेतू असून ते आपले आद्य कर्तव्य आहे. म्हणून या समाजाच्या विकासासाठी सर्व ते प्रयत्न झाले पाहिजे शिक्षणाची संधी ही तळागाळातल्या तांडी वाड्यातल्या कोपऱ्यापर्यंत पोहोचली पाहिजे म्हणून शिक्षण हे त्यासाठी प्रभावी माध्यम आहे .

कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मूल्यमापन हे त्या देशातील शिक्षण पद्धतीत केले पाहिजे. म्हणून शिक्षणपद्धतीची गंगा सर्व समाज घटकापर्यंत पोहचविणे अनिवार्य आहे. याला बंजारा समाज हा अपवाद नाही .

शासनाने बंजारा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सुद्धा सोयी सुविधा उपलब्ध केले आहेत. राज्यातील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांसाठी शक्य तेथे आश्रमशाळा सुरू केले आहेत. आश्रम शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना सर्व सुविधा मोफत पुरविल्या जातात. उदाहरणार्थ जेवणाची, राहण्याची सोय, कपडे व या पुस्तके या सर्व सुविधा पुरविल्या जाऊनही समाजातील विद्यार्थ्यांची गळतीचे प्रमाण वाढत आहे . या समाजातील विद्यार्थ्यांचे प्रगतीसाठी आश्रमशाळांना जोडून बालवाड्या, संस्कार केंद्र, निवासी केंद्र, शाळा विद्याश्रम, वस्तीग्रह, प्राथमिक व माध्यमिक शाळा या शैक्षणिक सुविधा पुरेशा आहेत. काय याचा शोध घेतला पाहिजे. बंजारा समाजातील जाणीव जागृती घडून येत आहे. का याचा शोध घेतला पाहिजे काय आहे व त्याबाबत.

शीर्षक

बंजारा समाजातील विद्यार्थ्यांचे प्राथमिक स्तरावरील शैक्षणिक विकासात मानववंशशास्त्रीय आणि संस्कृती आधारीत अध्यापनशास्त्रची भूमिका व परिणामकारकता - एक अभ्यास

समस्या विधान

आज महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये विखुरलेल्या बंजारा समाजातील विद्यार्थ्यांची दशा पाहून मन सुन्न होते कारण राहणीमान, खाण्याच्या पद्धती, पूर्वीपासून चालत आलेल्या रूढी, प्रथा, परंपरा, या बाबीवर आत्मनिरीक्षण करणे गरजेचे आहे. बंजारा समाजाच्या प्रत्येक तांड्यावर जात असताना काही रस्ते आजही बरोबर नाहीत. या गोष्टीवर मात करण्यासाठी शिक्षण ही काळाची गरज आहे. यासाठी प्राथमिक स्तरावरील शिक्षणात सुधारणा होणे गरजेचे आहे मुलींना सुद्धा शिक्षण देण्यात आले पाहिजे ते म्हणतात ना मुलगी शिकली प्रगती झाली त्याप्रमाणे मुलींना शिक्षणाची समान संधी देण्यात यावी बंजारा समाजातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांना शिक्षण हे काळाची गरज आहे. शिक्षणामुळे स्वतःचे, पालकांची, राज्याची, व देशाची सर्वांची प्रगती होते. हे त्यांना माहिती करून दिली पाहिजे. शेवटी प्रगती घडवून आणायची असेल शिक्षण हे असलेच पाहिजे आहेत हे समजावून दिले पाहिजे.

संशोधनाची गरज

प्रस्तुत संशोधनाकरिता निवडलेला विषय हा स्वतः समस्या विशद करणारा आहे बंजारा समाजातील विद्यार्थी अनेक विकासापासून वंचित राहिलेला आहे . पूर्वापार चालत आलेल्या चालीरीती, प्रथा, परंपरा, रूढी, संस्कृती, अडकलेला आहे . या समाजाच्या विकासाकरिता अनेक प्रयत्न झाले आहे . त्या प्रयत्नांना अधिक पणी यशस्वी करण्यासाठी त्यांचे संशोधनात्मक मूल्यमापन होणे महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन संशोधिकेने हा विषय निवडला आहे.

प्राथमिक स्तर म्हणजे वय वर्ष सहा ते चौदा या वयोगटातील विद्यार्थी राज्यातील वेगवेगळ्या विभागात या समाजातील सर्वच विद्यार्थ्यांचे संशोधन करण्यात आले आहे परंतु मराठवाड्यासारख्या मागास भागातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या परिक्षेत्रात बंजारा समाजातील विद्यार्थ्यांचे प्राथमिक स्तरावरील शैक्षणिक विकासात मानववंशशास्त्र आणि संस्कृती आधारित अध्यापनशास्त्राची भूमिका व परिणामकारकता एक अभ्यास यात प्राथमिक स्तरावर संशोधन झाले नसून त्याकरिता संशोधिकेने या विषयाची निवड केली आहे.

संबंधित साहित्याचा आढावा

संशोधिकेने स्वतःच्या विषयाबाबत संपूर्ण ज्ञान मिळावे यासाठी अध्यापन पद्धतीत शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापनशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, यासारख्या विषयांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ग्रंथांचा अभ्यास तसेच पुस्तके, संकेतस्थळ, शोध गंगोत्री, शोधगंगा, विविध ग्रंथ, यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्त्व

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात येते यामध्ये 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश होतो या संशोधनात या संशोधनात प्राथमिक स्तरावरील शैक्षणिक विकासाकरिता काय करावे या संबंधित माहिती मिळते प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या काय समस्या, अडचणी आहेत. याची माहिती होती. त्याच प्रमाणे मानवाची उत्क्रांती कशाप्रकारे झाली याचे ज्ञान प्राप्त होते. मानवी उत्क्रांती ची समाज बांधणी व संस्कृतीवर परिणाम या विषयांचा अभ्यास मानववंशशास्त्रात केला जातो. हा अभ्यास करताना मानवाचा उगम, भौतिक वैशिष्ट्ये, रीती, भाषा, प्रथा, परंपरा, रूढी या विषयी माहिती मिळते. मानववंशशास्त्र व कायदे व्यवस्था स्त्री - पुरुष समानता या सर्वांसाठी मानववंशशास्त्र व संस्कृतीचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण ठरतो.

समस्येचे स्पष्टीकरण

गावा कुसा पासून दूर दरी खोऱ्यात जंगल पारित जंगली पदाच्या सानिध्यात गाई गुरांच्या मागे फिरणारा आणि आजही शिकारीला जाणारा हा समाज आणि या समाजात जन्माला येणारा प्रत्येक विद्यार्थी आजही शिक्षणापासून वंचित आहे. आजचे युग हे विज्ञान युग किंवा प्रगतीचे युग असले तरी या विद्यार्थ्यांची मात्र प्रगती झालेली नाही. कारण त्यांना व त्यांच्या पालकांना शिक्षणाचा गंध नाही किंवा शिक्षणाचे महत्त्व कळत नाही. मी आज ज्या समाजात जन्माला आले असून माझे एकच ध्येय आहे. की माझ्या समाजातल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी सर्वांना शिक्षणाची संधी मिळावी व बंजारा समाजाची प्रगती व्हावी.

संशोधनाची उद्दिष्टे

1) बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

2) बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाशी संबंधित सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करणे.

3) बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सांस्कृतिक वैशिष्ट्ये, अध्ययनशैली, रहहिवास, सामाजिक पर्यावरण, यांचा मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून शोध घेणे.

4) बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या संस्कृती आधारित अध्यापनशास्त्राच्या भूमिकेत शोध घेणे.

5) बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचा परिणाम करणाऱ्या घटकांचे मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण करणे.

संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनासंबंधी खालील विधानाचे ग्रहीतके म्हणून निवड केली आहे.

1) सद्यस्थितीत बंजारा जमातीचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावल्या यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल आहे.

2) तांडा संस्कृती परिवर्तनाच्या वाटेवर आहे.

3) बंजारा समाजातील भाषा, साहित्य, संस्कृती, राहणीमान, खानपान, केशभूषा, वेशभूषा, या मध्ये बदल झाला आहे.

4) शिक्षण ही काळाची गरज आहे याची जाणीव झाली आहे.

5) मुलींना शिक्षणाची संधी देण्यात येत आहे.

6) प्राथमिक स्तराचा शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला जात आहे.

7) प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांचे गळतिचे प्रमाण कमी झाले आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधकाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गतनांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांचा प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाची मर्यादा-

1) प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील शाळा पुरतेच मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन मराठी माध्यमातील शाळा पुरतेच मर्यादित आहे.

3) प्रस्तुत संशोधनात केवळ बंजारा समाजातील विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार आहे.

4) प्रस्तुत संशोधन केवळ प्राथमिक स्तरा पुरतेच मर्यादित आहे.

संशोधनाची व्याप्ती-

1) प्रस्तुत संशोधनात शाळा, विविध शाळा प्रकाराचा समावेश केलेला आहे.

2) प्रस्तुत संशोधनात मुले व मुलींचा समावेश केलेला आहे.

3) प्रस्तुत संशोधनात शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागातील शाळांचा समावेश केलेला आहे.

संशोधनाची परिकल्पना

प्राथमिक स्तरातील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासात मानववंश व संस्कृति हे समजून सांगताना अडचणी येतील.

संशोधनाची कार्यपद्धती

1) प्रथम संबंधित साहित्याचा आढावा व समस्या निश्चित करण्यात येते.

2) समस्या उद्दिष्टानुसार संशोधन व नमुना कार्यपद्धती निश्चित करण्यात येते.

3) संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येते.

4) मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण लिहून ते अंतिम केले जाते.

5) माहिती संकलनाची साधनाचे प्रमाणीकरण करून माहिती गोळा करण्यात येते.

6) कोणती प्रेरणा स्तर चाचणी सदर संशोधनास उपयुक्त ठरेल याचा शोध घेण्यात येतो.

संशोधन पद्धती

शैक्षणिक क्षेत्रात अनेक अडचणी व समस्या पुढे येत आहेत या समस्या सोडवण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग केला जातो. तेव्हा त्याला शैक्षणिक संशोधन या नावाने संबोधले जाते या शास्त्रीय पद्धतीने या समस्येचे निराकरण करणे म्हणजे संशोधन होय संशोधन हे एखाद्या विषयांतर्गत असलेली वैशिष्ट्य जाण्यासाठी केलेला व्यापक शोध किंवा चिकित्सा होय. नवीन ज्ञान मिळवण्याच्या पद्धती संशोधन म्हंटले जाते रेडमन म्हणतो संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेले सुव्यवस्थित प्रयत्न किंवा प्रमाण होय.

संशोधन समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य पद्धतीचा उपयोग करणे आवश्यक आहे. तसेच संशोधन हे कोणत्या विषयाचे आहे त्यानुसार संशोधन पद्धतीचा विचार करावा लागतो.

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या समस्येचे स्वरूप व्यापक व गुंतागुंतीचे असल्यामुळे एकाच पद्धतीने केलेल्या संशोधनावर अनेक मर्यादा येऊ शकतात म्हणून या संशोधनात गुणात्मक संख्यात्मक दृष्टिकोनाचा समावेश केलेला आहे. संशोधनाचे वैशिष्ट्ये क्रमांक १ व क्रमांक 2 चा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. तसेच उर्वरित उद्दिष्टांसाठी आशय विश्लेषण आणि वंशिक पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधनासाठी नमुना निवड

प्रस्तुत संशोधनाच्या नमुन्यात विविध प्रकारच्या घटकांचा समावेश आहे.

१) बंजारा समाज व शिक्षण यांचे अभ्यास.
२) बंजारा समाजातील शिक्षक व पालक.
३) बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी यापैकी अभ्यासक, शिक्षक, पालक, यांची निवड सहेतुकपणे केली जाईल, तर विद्यार्थ्यांचा नमुना याद्रुच्छिक पद्धतीने निवडला जाईल.

माहिती संकलनाची साधने

संशोधनासाठी जो विषय निवडला आहे. त्यासंबंधी माहिती गोळा करण्यासाठी विविध साधने व तंत्रे वापरावी लागतात सर्व साधने उपयुक्त नसतात त्यामुळे अनेक साधनातून योग्य साधनांची निवड करावी लागते. त्यामध्ये प्रामुख्याने 1) निरीक्षण 2) मुलाकात 3) प्रश्नावली 4) पडताळा सूची इत्यादी.

माहिती विश्लेषणाची साधने

प्राप्त माहितीचे विश्लेषण संख्यात्मक व गुणात्मक साधने उपयोगात आणून केली जाईल.

प्रकरण योजना

संशोधिकेने चांगले होण्यासाठी प्रकरण योजना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे हे संशोधन समस्या कुणालाही पहायचे असल्यास त्याला कोणती माहिती पाहिजे आहे. ती संशोधनाच्या अनुक्रमणिकेवर कळते अनुक्रमणिकेवर संशोधनात कशाचा वापर करण्यात आलेला आहे. ते समजते व वेळेची बचत होते प्रकरण योजनेत संशोधन हे उपयुक्त ठरते प्रकरण योजना ही अतिशय प्रभावीपणे करण्यात येते.

प्रस्तुत संशोधनात सर्वप्रथम प्रस्तावना, शीर्षक, समस्या विधान, संशोधनाची गरज, संबंधित साहित्याचा आढावा, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची परिकल्पना, संशोधनाची कार्यपद्धती, संशोधन पद्धत, संशोधनाची जनसंख्या, संशोधनाचा नमुना, नमुना निवड पद्धती, माहिती संकलनाची साधने, माहिती विश्लेषणाची साधने, प्रकरण योजना, वेळापत्रक, खर्चाचे अंदाजपत्रक, संदर्भग्रंथ, समारोप या प्रमाणे व्यवस्थित मांडणी करण्यात आलेली आहे.

वेळापत्रक

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे संशोधन कार्याचे वेळापत्रक ठरविले आहे.

अनुक्रमाक	तपशिल	कालावधी
०१	संशोधन विषयक निश्चिती	जुलै २०२१
०२	पूर्व संशोधन साहित्याचा आढावा	सप्टेंबर २०२१
०३	संशोधन आराखडा	जानेवारी २०२२
०४	माहिती संकलन साधन निर्मिती व प्रमाणीकरण करणे	जून २०२२
०५	माहितीचे संकलन	डिसेंबर २०२२
०६	माहितीचे विश्लेषण	जून २०२३
०७	अहवाल टंकलेखन	डिसेंबर २०२३

खर्चाचे अंदाजपत्रक

अनुक्रमाक	तपशिल	खर्च
०१	पीएचडी प्रवेश शुल्क	२०,०००.००
०२	संबंधित साहित्यांचा आढावा	३०,०००.००
०३	संदर्भ ग्रंथ खरेदी	२५,०००.००
०४	संगणक खरेदी	५५,०००.००
०५	टंकलेखन	२५,०००.००
०६	झेरॉक्स	१५,०००.००
०७	प्रबंध दहा प्रतीत	२०,०००.००
०८	कार्यशाळा, चर्चासत्रे	२५,०००.००
०९	प्रवास खर्च	२५,०००.००
१०	माहिती संकलन खर्च	३०,०००.००
११	प्रबंध दाखल करणे शुल्क	२०,०००.००
	एकूण खर्च	२,८५,०००.००

संदर्भ ग्रंथ

पाटील बळीराम (१९३९), गोर बंजारा लोकांचा इतिहास – देशमुख प्रकाशन अमरावती.
ईरावती कर्वे (१९७२), संस्कृती – देशमुख प्रकशन पुणे.
राठोड आत्माराम कनिराम (१९९४), गोर बंजारा – गारवट प्रकाशन, पुसद.
पवार रुक्मिणी बाई, - बंजारा समाजच्या शास्त्रीय पध्दतीचा अभ्यास.
राठोड मोतीराज, - तांडा संस्कृती – अस्मिता प्रकाशन, औरंगाबाद.
राठोड आर.आर. – विमुक्त वेध निर्मल प्रकाशन
टोहडा सरदार गुरुचरणसिंघ – बंजारा समाजेरो मुळ इतिहास आणि शीख धर्माशी संबंध.
शोध गंगा, शोध गंगोत्री, विविध वर्तमाणापत्र ईत्यदी.

समारोप

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रथमता समस्येची निश्चिती करून त्याचे गरज व महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे त्यानंतर संशोधन समस्या सांगण्यात आले आहेत संशोधित केला भेडसावणाऱ्या समस्या वर संशोधनाची उद्दिष्टे मांडली असून उद्दिष्टानुसार त्यांची मांडणी केली आहे त्यानंतर व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या आहेत त्यानंतर संशोधनाची परिकल्पना संशोधनाची कार्यपद्धती संशोधन पद्धती संशोधनाची जनसंख्या संशोधनाचा नमुना नमुना निवड पद्धती माहिती संकलनाची साधने साधने प्रकरण योजना वेळापत्रक खर्चाचे अंदाजपत्रक संदर्भग्रंथ समारोप सांगण्यात आले आहे

बंजारा समाजातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा अधिकाधिक विकास होणे हे या संशोधना मागचा हेतू आहे या विद्यार्थ्यांच्या समस्या सांगण्यासाठी या विषयाची निवड संशोधकाने केलेली आहे.

संशोधिका

स्वाती रामचंद्र राठोड

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्गदर्शक

डॉ. जोशी एम. एम सहाय्यक प्राध्यापक,

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड